अधिसुचना

क्रमांक :-१४५ /२०२५ दिनांक :- ०२/०९/२०२५

विषय :- अधिसुचना क्र. ७७/२०२४ दि. १२.०७.२०२४ नुसार विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणारे शुल्क संबंधित निर्गमित करण्यात आलेल्या अधिसुनेमध्ये दुरुस्ती आणि अधिसूचना क्र. ८६/२०२५ व परिपत्रक संबंधात.

संदर्भ :- १) अधिसुचना क्र. ७७/२०२४ दि. १२.०७.२०२४
२) शासनाचे पत्र क्र. बैठक – २०२५/ प्र. क्र.स ४१/तांशि – ४, दि. २० मे, २०२५
३) अधिसुचना क्र. ८६/२०२५, दि. २९.०६.२०२५
४) परिपत्रक क्रमांक :- संगाबाअवि/८/सी - १६३४ /२०२५, दि. २२/०७/२०२५
५) सह संचालक (ता.शि.) अमरावती यांचे दिनांक ०१/०७/२०२५ चे पत्र

ज्याअर्थी, उपरोक्त अधिसुचना क्र. ७७/२०२४ अन्वये सत्र २०२४-२५ पासून विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत अधिसुचित करण्यात आले आहे.

आणि

ज्याअर्थी, उपरोक्त अधिसुचनेतील Appendix-B (unaided courses) अंतर्गत नमुद बी.बी.ए व बी.सी.ए या अभ्यासक्रमाचा AICTE अंतर्गत समावेश करण्यात आला आहे.

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. बैठक – २०२५/ प्र. क्र.स ४१/तांशि – ४, दि. २० मे, २०२५ च्या पत्रान्वये बी.बी.ए., बी.सी.ए. अभ्यासक्रमांचा AICTE अंतर्गत समावेश झाल्यामुळे या संर्कमण कालावधीकरीता विद्यापीठाला शुल्क निश्चित करुन सादर करावयाचे निर्देश दिले आहेत.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १०१ (२) अंतर्गत कार्यवाही करुन मा. अधिष्ठाता मंडळामार्फत शुल्क निश्चिती समितीमार्फत, शुल्क व इतर शुल्क ठरविण्यात आले आहे व विद्या परिषदेला शिफारस केली आहे. शासनाला तातडीने कळवायचे असल्यामुळे विद्या परिषदेच्या वतीने कलम ३३ (१) (e) अंतर्गत सदर शुल्कास मान्यता देण्यात आली आहे.

आणि

ज्याअर्थी संदर्भ क्र. ३ वरील अधिसुचनेनुसार बी.बी.ए. व बी.सी.ए., अभ्यासक्रमासाठी सत्र २०२५-२६ पासुन शुल्क आकारण्याबाबत अधिसुचित करण्यात आले आहे. परंतु सत्र २०२४-२५ मध्ये प्रथम वर्षात प्रवेशित शिष्यवृत्ती प्राप्त होणाऱ्या व ना होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून वाढीव शुल्क आकारण्यात बाबतीत स्पष्टता देण्यात आली नव्हती.

आणि

ज्याअर्थी दि. २९/०६/२०२५ ला अधिसुचना क्र. ८६/२०२५ निर्गमित करण्यात आल्यानंतर सहसंचालक तंत्र शिक्षण अमरावती यांचे दि. ०१/०७/२०२५ चे पत्र प्राप्त झाल्याने मा. कुलगुरुंनी समिती नियुक्त केली होती या समितीने दि. ३०/०८/२०२५ ला सादर केलेल्या अहवालातील शिफारसीला मा. कुलगुरुंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा – २०१६ च्या कलम १२ (७) अंतर्गत विद्या परिषदेच्या वतीने मान्य केले आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना माहिती व कार्यवाहीस्तव अधिसुचित करण्यात येते की, या अधिसूचना व्दारे अधिसूचना क्र. ८६/२०२५ व दिनांक २२/०७/२०२५ रोजीचे परिपत्रक अधिक्रमित करुन उपरोक्त क्र. १ वरील अधिसुचनेमध्ये असलेले Appendix-B मध्ये (unaided courses) बी.बी.ए., बी.सी.ए. या अभ्यासक्रमचे रकाना क्र. ४ मध्ये (fee for courses) नुसार असलेले शुल्क अनु. क्र. १, ३, ५, १० मध्ये असलेले शुल्कामध्ये खालीलप्रमाणे बदल करुन तसे शुल्क सत्र २०२४-२०२५ पासून आकारण्यात येईल. तसेच सदर सत्र २०२४-२०२५ मध्ये प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांकडून ज्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही अशा विद्यार्थ्यांकडून वाढीव शुल्क आकारण्यात येवु नये.

अनु.क्र.	Item/Head	Present Fee		B.C.A.	B.B.A.
1.	Tution Fee	Rs. 6000/-	ऐवजी	Rs. 27,500/-	Rs. 23,500/-
3.	Laboratory Fee	Rs. 5280/- (BCA) Rs. 1760/- (BBA)	ऐवजी	Rs. 6100/-	Rs. 4100/-
5.	Library Fee	Rs. 1760/-	ऐवजी	Rs. 2025/-	Rs.2025/-(15% increase)
10.	Excursion/Industrial Tour/Field visit.	Rs. 110/-	ऐवजी	Rs. 1500/-	Rs. 1500/-

उपरोक्त शुल्क संक्रमण कालावधीकरीता व जोपर्यंत शासन स्तरावर (FRAकडून)सदर शुल्क निश्चिती होत नाही तोपर्यंत उपरोक्त शुल्क हे शासन मान्यतेच्या अधिन राहुन आकारण्यात येईल.

संदर्भ क्र. (३) वरील अधिसुचना क्र. ८६/२०२५ व (४) वरील असलेले परिपत्रक दिनांक २२/०७/२०२५ अधिक्रमित करण्यात येत आहे.

स्वा/-
(डॉ.अविनाश असनारे)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ